# प्रेसनोट

**पोलीस अधीक्षक कार्यालय नांदेड जा.क्र. ३९६/२०१९ दिनांक १४/११/२०१९**

## नांदेड शहरातील जनतेस जलद प्रतिसादासाठी २५ पोलीस चौकी झाल्या कार्यान्वित

नांदेड शहरात सहा (६) पोलीस स्टेशन असून नमूद पोलीस स्टेशन अंतर्गत एकूण २५ पोलीस चौक्या उपलब्ध आहेत. आम्ही दि.१२/११/१९ व दि.१४/११/१९ रोजी पासून नांदेड शहरातील सहा पोलीस स्टेशन हद्दीतील २५ चौक्यांना भेटी दिल्या असता बहुतेक पोलीस चौक्या बंद असल्याचे निदर्शनास आले होते. नमूद चौक्या आज पासून नांदेड शहरात **Street Policing** साठी कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत. मागील कालावधीमध्ये नांदेड शहरात विधानसभा निवडणुक, बाबरी मस्जिद/रामजन्मभूमी आयोध्या निकाल इत्यादी महत्वाचे बंदोबस्त शांततेत पार पाडण्यात आलेले आहेत. नांदेड शहरातील पोलीस स्टेशन हद्दीत पोलीस चौकीच्या अनुषंगाने नांदेड शहरातील सहाही पोलीस स्टेशन हद्दीतील मा.पोलीस अधीक्षक यांनी नांदेड शहरातील सर्व पोलीस चौकी यांना भेटी दिल्या असता बऱ्याच पोलीस चौकी बंद असल्याचे निदर्शनास आले होते. मा.पोलीस अधीक्षक यांनी सदर पोलीस चौक्या पुन्हा कार्यान्वित केल्या आहेत. नांदेड शहरातील बऱ्याच चौक्या ह्या तत्कालीन पोलीस अधीक्षक मा.श्री.लक्ष्मीनारायण साहेब यांनी स्थापन केलेल्या आहेत. नमूद पोलीस चौक्या व या व्यतिरिक्त नव्याने चौक्या कार्यान्वित करून खालीलप्रमाणे पोलीस अधिकारी व कर्मचारी नेमण्यात आलेले आहेत. अप्पर पोलीस अधीक्षक, नांदेड व उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग नांदेड शहर व इतवारा हे पोलीस चौकीला नियमित भेटी देवून त्यांचे कामकाजावर नियंत्रण ठेवतील.

नांदेड शहरातील एकूण पोलीस स्टेशन :- **(०६)**
नांदेड शहरातील एकूण पोलीस चौक्या :- **(२५)**
चौकीसाठी नेमण्यात आलेले सपोनि/पोउपनि दर्जाचे अधिकारी :- **(३०)**
चौकीसाठी नेमण्यात आलेले कर्मचारी :- **(१४०)**

**पोलीस चौकीतील अधिकारी व कर्मचारी यांनी करावयाची कार्यवाही :-**

१. नांदेड शहरात होणाऱ्या घरफोडया, चोऱ्या, चैन स्नॅचिंग, गंभीर स्वरुपाचे गुन्हे यांना प्रतिबंध करणे तसेच तलवारी, खंजीर वापरणाऱ्या गुंडावर प्रतिबंधक कार्यवाही करणे व चौकीच्या हद्दीत असणारे अवैध धंदयांचे समूळ उच्चाटन करणे व नमूद गुन्हयांची पुनरावृत्ती टाळणे.
२. पोलीसांनी चौकीच्या हद्दीतील प्रतिष्ठीत व्यक्ती, जनतेसोबत संपर्क वाढवणे जेणेकरून कायदा व सुव्यस्था हाताळण्यासाठी मदत होईल.
३. चौकी कार्यान्वित झाल्याने तेथील अधिकारी व कर्मचारी यांना दाखल गुन्हयाचे तपासातील कागदपत्रे, पंचनामे व इतर गोष्टींमध्ये सुरळीतपणा येईल तसेच गुन्हे निष्पन्न होण्यास मदत होईल.
४. चौकीच्या हद्दीतील गुंडागर्दी व भाईगीरी करणाऱ्या गुन्हेगारांवर प्रतिबंध करावा तसेच त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवावे.

५. चौकीच्या हद्दीतील शाळा, महाविद्यालय, कोचिंग क्लासेस या ठिकाणी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी भेटी देवून तरुणींची छेडछाड करण्यास प्रतिबंध करावा व त्यांना तात्काळ मदत देण्यात यावी.
६. पोलीस चौकींच्या हद्दीत २० ते २५ हजार लोकसंख्या असल्याने त्यांना तात्काळ मदत करणेकामी नमूद चौकीवर अधिकारी व कर्मचारी २४ तास हजर राहतील.
७. नांदेड शहरातील तसेच चौकीच्या हद्दीतील व्हिसीबल पोलीसींग होऊन गुन्हेगारीवर आळा बसेल.
८. पोलीस चौकीतील अधिकारी व कर्मचारी यांचे जनसंपर्क वाढल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यावर हद्दीतील प्रतिष्ठित व्यक्ती व लोकप्रतिनिधी मार्फत तात्काळ नियंत्रण मिळवता येईल.

**नांदेड शहरातील बिट मार्शल :-**

नांदेड शहरात मा.पोलीस अधीक्षक यांच्या नविन संकल्पनेतून शस्त्रासह बिट मार्शल नेमण्यात आलेले आहेत. सदर बिट मार्शल हे पोलीस स्टेशन हद्दीमध्ये २४ तास पेट्रोलिंग करतील. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उदभवल्यास तात्काळ मदतीसाठी जातील. नियंत्रण कक्ष व पोलीस स्टेशनहून त्यांना फोन आल्यास तात्काळ त्याप्रमाणे कार्यवाही करतील.

**नाकाबंदी :-**

नांदेड शहरात गुन्हेगारांवर आळा घालण्यासाठी नांदेड शहरातील २० ठिकाणी नाकाबंदी पॉईंट नेमण्यात आलेले आहेत. नांदेड शहर लगतच्या परिसरात मालाविषयीच्या गंभीर स्वरुपाच्या गुन्हयास अथवा इतर गंभीर घटना घडल्यास नियंत्रण कक्ष अधिकारी यांचेकडून आदेश प्राप्त होताच त्वरीत नाकाबंदी लावण्यात यावी. नाकाबंदी दरम्यान खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. शहरात येणारे वाहन चेक करतील.
२. संशयित वाहनावर कार्यवाही करावी.

नांदेड शहरातील जनतेच्या या व्यतीरीक्त अजून काही सूचना असल्यास खालील मोबाईल क्रमांकांवर **व्हॉट्सअॅप मॅसेज** पाठवावा.

पोलीस अधीक्षक, नांदेड मो.क्र. ७७७४०७७१००
अपर पोलीस अधीक्षक, नांदेड मो.क्र. ९४०३६८६३४२
उपविभागीय पोलीस अधिकारी नांदेड शहर मो.क्र. ७३८७५४६८४०
उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग इतवारा मो.क्र. ९१११२२४४८८८

**पोलीस अधीक्षक कार्यालय,**
**नांदेड**